बोर्डीनाला मध्यम प्रकल्प, ता. चांदूरबाजार, जि. अमरावती -प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक :- सुप्रमा-२०१९/८२/(प्र.क्र.२९/१९)/ म.प्र.

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :-०२ मार्च ,२०१९.

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र.बोर्डी २००६/१३४/(४७/२००७)/जसंअ, दि. १७/१०/२००६.
२) शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं (आ), दि. ०९/०९/२०१५
३) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर यांचे पत्र क्र.१४८१/विपाविमं/कातां-७/धा.क्र. १८९/२०१८)/२०१९, दि. ०६/०२/२०१९.

प्रस्तावना:-

बोर्डीनाला मध्यम प्रकल्प हा प्रकल्प विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत अमरावती जिल्ह्यातील चांदूरबाजार तालुक्यातील बोरगाव मोहना गावाजवळ बोर्डी नाल्यावर प्रस्तावित आहे. बोर्डी नाला मध्यम प्रकल्पामधे मेघा नदीवर (पूर्णा नदीची उपनदी) पाळा गावाजवळ संधानकातील वळण बंधारा बांधुन त्यातुन फिडर कालव्याद्वारे कोंडवर्धा संतुलित बंधारा व बोरगाव मोहना या धरणात पाणी आणणे व गरजेनुसार बोरगाव मोहना धरणातुन उपसा सिंचन योजनेद्वारे सिंचन करावयाचे नियोजन आहे. अमरावती जिल्हयातील चांदूरबाजार व अचलपूर तालुक्यातील १३ गावांतील ४१२६ हेक्टर सिंचन क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

प्रकल्पाचा एकूण पाणीवापर २७.९४९ द.ल.घ.मी असून २२.७३ द.ल.घ.मी. पाणी सिंचनासाठी, २.६३१ द.ल.घ.मी. पाणी पिण्याच्या पाणी व बाष्पीभवन व्यय २.५८८ द.ल.घ.मी. असा होणार आहे.

बोर्डीनाला मध्यम प्रकल्पास संदर्भ क्र. १ नुसार सन २००३-०४ चे दरसूचीवर आधारीत रू. १००.८० कोटी (रूपये शंभर कोटी अंशी लक्ष फक्त) इतक्या रकमेस मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार विदर्भ व मराठवाड्यातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार संबंधित सिंचन महामंडळास प्रदान करण्यात आले आहेत. तथापि सदर शासन निर्णयातील परिच्छेद ४ नुसार नियामक मंडळाने सु.प्र.मा. प्रस्ताव मा. मंत्रीमंडळाच्या विचारार्थ सादर करावा असा निर्णय घेतल्यास सु.प्र.मा. प्रस्ताव मा. मंत्रीमंडळास सादर करण्याची तरतुद आहे.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या दि. ०४/१०/२०१८ रोजी झालेल्या ७१ व्या बैठकीत बोर्डीनाला मध्यम प्रकल्पाचा रु.५१५.९६ कोटी किंमतीचा प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेकरिता सादर करण्याबाबत ठराव क्र. ७१/३ पारित करण्यात आला आहे.

त्यास अनुसरून कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे संदर्भ क्र.३ अन्वये सन २०१६-१७ चे दरसूचीवर आधारीत रु. ५१५.९६ कोटी किंमतीचा प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मा. मंत्रीमंडळाच्या निर्णयार्थ सादर करण्यास शासनास सादर केला आहे. प्रकल्पाचे लाभ व्यय गुणोत्तर १.०४ येत असून प्रकल्प आर्थिक मापदंडात बसत नाही.

सदर प्रकल्पाचा प्रशासकीय मान्यता किंमत रु. १००.८० कोटी च्या तुलनेत प्रथम सुधारित प्रकल्प अहवालाची किंमत रु. ४१५.१६ कोटीने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत :-

अ.क्र.	बाब	वाढ (रुपये कोटी)
१	२	३
१	दरसूचीतील बदलामुळे	४४.८८
२	भूसंपादनाच्या किंमतीत झालेली वाढ	३५.३१
३	संकल्पचित्रातील बदल	२०३.९३
४	अपु-या तरतुदी मुळे झालेली वाढ	२५.३५
५	ईतर कारणामुळे झालेली वाढ	९३.४४
६	अनुषंगीक खर्च	१२.२५
	एकुण वाढ	**४१५.१६**

प्रकल्पाचा एकूण पाणीवापर २७.९४९ द.ल.घ.मी इतका आहे. अमरावती जिल्ह्यातील अचलपूर व चांदूरबाजार या तालुक्यातील ४१२६ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रस्ताव मा. मंत्रीमंडळच्या दि. २७/०२/२०१९ रोजीच्या बैठकीत विचारार्थ सादर करण्यात आला.

मा. मंत्रीमंडळाने बांधकामाची सद्य:स्थिती, किंमतवाढीची कारणमीमांसा इ. बाबींचा परामर्श घेऊन बोर्डी नाला मध्यम प्रकल्पाच्या सन २०१६-१७ दरसूची वर आधारित रु. ५१५.९६ कोटी किंमतीच्या प्रथम सुधारित प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

शासन आता या निर्णयाव्दारे बोर्डीनाला मध्यम प्रकल्पाच्या सन २०१६-१७ च्या दरसूचीवर आधारीत रु. ५१५.९६ कोटी (रूपये पाचशे पंदरा कोटी सोळा लक्ष फक्त) इतक्या किंमतीच्या प्रथम सुधारित प्रकल्प अहवालास प्रशा़सकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यापैकी रु. ४८४.७७ कोटी (रुपये चारशे चौ-यांशी कोटी सत्यात्तर लक्ष फक्त) कामाप्रित्यर्थ व रु. ३१.१९ कोटी (रुपये एकतीस कोटी एकोणवीस लक्ष फक्त) अनुषंगिक खर्चासाठी तरतूद आहे. सोबत उपशिर्ष निहाय तरतुदींचा गोषवारा दिलेला आहे.

२. या योजनेस प्रदान केलेली प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता मध्यम प्रकल्प कार्यासनाच्या नोंदवहीमध्ये अनुक्रमांक ०४/ २०१९ वर नोंदवण्यात आली आहे.

३. सदर प्रकल्पाचे उर्वरित काम नियोजित वेळेत व सुधारित प्रशासकीय मान्यता तरतूदीच्या मर्यादेत पूर्ण करण्यात यावे.

४. या प्रकल्पाच्या कामावर होणारा खर्च मागणी क्रमांक- आय-५, मुख्य लेखाशीर्ष ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधा-यावरील भांडवली खर्च, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका (०२) योजनांतर्गत,(०२)(०२) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (मध्यम प्रकल्प) (४७०१ एच ६६५) या लेखाशिर्षाखाली खर्च टाकावा व त्याखालील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

५.१) सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयी करण्याच्या विविध टप्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहित धरता येणार नाही.

५.२) या प्रकल्पाबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशीची कार्यवाही पूढे चालू ठेवावी.प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही.

५.३) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय प्रकल्पात समावेश करण्यात येऊ नये.

५.४) प्रगतीपथावरील निविदांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. पाणीसाठ्याचा सिंचनाकरिता जास्तीतजास्त लाभ होईल अशा प्रकारे उर्वरित कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा व त्यानुसार कामे/निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

५.५) सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन,निधी वितरण अथवा अतिरिक्त खर्च करता येणार नाही. या संदर्भात प्रचलित शासन निर्णय, CWC ची मार्गदर्शक तत्वे, वित्त अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपद्धती याची काटेकोरपणे अंबलबजावणी करण्यात यावी.

५.६) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या छाननी अहवालात नमूद मुद्दा क्र. २६ व २७ चे अनुपालन करण्यात यावे.

५.७) सचिव स्तरीय उपसमितीने नमूद केल्यानुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी तसेच केंद्रीय जल आयोगाची मान्यता घेण्याबाबत सत्वर कार्यवाही करण्यात यावी.

५.८) प्रकल्पाचे काम नियोजना नुसार पूर्ण करण्यात यावे .

६. सदर शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारीक संदर्भ क्रमांक २०/का१४३४ दिनांक ०७/०२/२०१९, वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्रमांक ५५/व्यय१२ दिनांक २६/०२/२०१९ व दि.२७/०२/२०१९ रोजी झालेल्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०३०२१७२४४९१९२७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dharane Mallikarjun Irappa

Digitally signed by Dharane Mallikarjun Irappa
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42153c779eba7d6ca17364b6d37857b105b20a01d36c767c7ed1d7d278837bd7, serialNumber=8a9bdce987e31fe4e079969a0eb71bce94df0f9984bd752cc203bcd86349bbb5, cn=Dharane Mallikarjun Irappa
Date: 2019.03.02 17:27:17 +05'30'

सहपत्र :- उपशीर्षनिहाय तरतुदींचा गोषवारा

(म.ई.धरणे)
शासनाचे उप सचिव

प्रत, सहपत्रांसह :-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई

५) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
११) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर.
१२) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
१३) मुख्य अभियंता (द.व प्र) व सहसचिव यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, जलसंपदा विभाग, नागपूर.
१५) उपसचिव(मो.प्र-१/मो.प्र-२/जसं/निवसं/सिंव्य/लाक्षेवि/लपा/जवि),यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) आंतरवित्त सल्लागार व उपसचिव यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) अधीक्षक अभियंता, अमरावती पाटबंधारे प्रकल्प मंडळ, अमरावती.
१८) कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण विभाग,अमरावती.
१९) वित्त विभाग (व्यय-१२/ अर्थ-०२/अर्थ-१०/व्यय-६ अ), मंत्रालय, मुंबई.
२०) नियोजन विभाग (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई.
२१) मध्यम प्रकल्प कार्यासन संग्रहार्थ.

उपशीर्ष निहाय तरतुदींचा गोषवारा

बोर्डीनाला मध्यम प्रकल्प, ता. चांदूरबाजार, जि. अमरावती

शासन निर्णय क्र. सुप्रमा-२०१९/८२/(प्र.क्र.२९/१९)/म.प्र., दि. ०२/०३/२०१९ चे सहपत्र.

अ.क्र.	तपशील	प्रस्तावित प्रथम सु.प्र.मा.नुसार किंमत कोटी रु.
१.	ए-प्राथमिक	०.८७
२.	बी-भूसंपादन	८३.६१
३.	सी-कामे	३०१.५१
४.	डी - विमोचके	४.१०
५.	के-इमारती	०.७८
६.	एम - वृक्षारोपण	०.३१
७.	ओ-संकिर्ण	२.७८
८.	पी-देखभाल	१.९१
९.	आर-दळणवळण	०.४६
१०.	उपसा सिंचन योजना	२३.२६
११.	एक्स-पर्यावरण	०.४५
	एकूण I - शिर्षकामे	**४२०.०४**
	एकूण II-कालवे (नलिका वितरण प्रणाली)	**६४.७३**
	ईटीपी चार्जेस	३१.१९
	एकूण	**५१५.९६**